# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

---

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ८५/२०१३-१४/३ दिनांक :०४.०४.२०१४

**आदेश केस क्र.८५/१३-१४**

श्री. तानाजी राणोजी चौगले,
रि.स.नं.२९८/३,बी-११,
गोविंदराव कलिकतेनगर,
जिल्हा - कोल्हापूर.

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, शहर कोल्हापूर.

३) उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय, पश्चिम, कोल्हापूर.

विरुध्द पक्षकार

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

## न्याय निर्णय

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. तानाजी राणोजी चौगले, यांनी परिशिष्ट अ मध्ये दि.२६.०२.१४ रोजी मंचाकडे विभागीय कार्यालय,शहर कोल्हापूर यांचेविरुध्द अर्ज केला. अर्जदार यांनी घरगुती कनेक्शनसाठी दि.१८.०४.१२ रोजी अर्ज दिलेला होता. सर्व्हे नं.२१८/३ येथे वीज जोडणी न मिळाल्यामुळे ०७.११.२०१२ रोजी दुसरा अर्ज कंपनीने घेतला. अंतर्गत कक्ष,सांगली, येथे दि.१७.१०.२०१३ ला अर्ज केला. दि.१३.०१.१४ रोजी आदेश झाले. दि.२४.०२.१४ रोजी चलन दिले. झालेला विलंब व मानसिक त्रासापोटी भरपाई मिळावी अशी मागणी केली.

वितरण कंपनीने दि.१३.०३.२०१४ च्या पत्रान्वये मंचासमोर दि.१८.०३.२०१४ च्या सुनावणीस आपले म्हणणे मांडले. अर्जदार यांचा सिंगल फेज कनेक्शनसाठीचा एप्रिल,१२ चा अर्ज होता. अंदाजपत्रक दि.०४.०६.१२ ला मंजुर केले. ग्राहकास अंदाजपत्रकानुसार रु.१००/- चा बॉंड लिहून देण्यास कळविले. परंतु तसा बॉंड न देता ग्राहकाने दि.०७.११.१२ रोजी ग्राहक सुविधा केंद्र येथे १ कि.वॅ.विद्युत भार मिळण्यासाठी (घरबांधकामासाठी) अंतर्गत कक्षाच्या आदेशाप्रमाणे दि.१०.०२.१४ रोजी कार्यकारी अभियंता यांनी एसपीए पीई (६४१५) या निधीअंतर्गत २ पोल कंडक्टर व इतर साहित्याची मागणी करुन ग्राहकास रु.८८०/- चे कोटेशन दिले. ठेकेदार शोधून दि.०३.०३.१४ रोजी ऑर्डर देऊन ०७.०३.१४ रोजी वीज कनेक्शन देण्यात आले. त्यामुळे या सर्व बाबींची विलंबापोटी भरपाई देतांना नोंद घ्यावी.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि.१८.०३.१४ रोजी घेण्यात आली. ग्राहकातर्फे त्यांच्या पत्नी व मुलगा उपस्थित होते. वितरण कंपनीतर्फे श्री.आरळी व उपकार्यकारी अभियंता उपस्थित होते. ग्राहकाच्या पत्नी यांनी वीजपुरवठा सुरु झाल्याचे मान्य केले. वितरण कंपनीच्या अधिका-यांनी विलंबापोटी भरपाई देऊ नये. कनेक्शन देण्यासाठी कार्यालयाने जास्तीतजास्त श्रम घेऊन मंजुरी घेऊन साहित्याची मागणी केली. ठेकेदार शोधून चलन भरल्यानंतर दि.०७.०३.१४ रोजी वीज जोडणी दिली. ग्राहकाने प्रथम अर्ज दि.०७.११.१२ रोजी दिला. परत दि.१८.०४.१२ पासून दुस-यांदा सर्व कार्यवाही करायला लागली. मंचाने वितरण कंपनीच्या अधिका-यांना दि.०७.११.१२ पासून एक महिना वजा करुन उर्वरित कालावधीसाठी भरपाई का देऊ नये अशी विचारणा केली. या कामासाठी फंडस् नव्हते. कलेक्टरशी विशेष बैठक घेऊन फंडस् मंजुर केला. या कारणांचा विचार होऊन भरपाई माफ करावी असे सांगितले.

वीज जोडणीचे काम सिंगल फेज एल.टी.लाईन वर होते. चलन देणेस व कृती मानंकानुसार वीज जोडणी देण्यास निश्चित विलंब झाला आहे. कृतीमानंकानुसार विलंबापोटी भरपाई मिळणे हा ग्राहकाचा हक्क आहे. ती वितरण कंपनीची जबाबदारी आहे. परंतु ग्राहकातर्फे उपस्थित असलेल्या त्यांच्या पत्नी व मुलगा यांनी वीजजोडणी मिळाली आहे तसेच विलंबापोटी भरपाई नको असल्याचे मंचासमोर तोंडी चर्चेच्या दरम्यान सांगितले. तशा प्रकारचे लेखी पत्र मंचास दिले आहे. त्यामुळे ग्राहकाचे वीजजोडणीचे गा-हाणे दूर झाले आहे. विलंबापोटीची भरपाई ग्राहकाने सोडून दिलेने तक्रार निकाली काढणेत येत आहे.

दिनांक : ०४.०४.२०१४

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष

श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष